# पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा सुचना

सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या उन्हाळी–२०२० पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेणेसाठी सविस्तर कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांची **तिसऱ्या** व **चौथ्या** सत्राची परीक्षा ही विद्यापीठामार्फत घेणार आहे याचे सूधारीत वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे

२. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतीम सत्रास परीक्षार्थी असलेल्या विद्यार्थ्यांच्या **पहिल्या व दुसऱ्या** सत्राच्या बॅकलॉगच्या विषयांची परीक्षा महाविद्यालय स्तरावर खालील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तारखे दरम्यान घेण्यात येईल. या परीक्षा ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने बहुपर्यायी (M.C.Q.) प्रश्नसंच देवुन घेण्यात येतील.

३. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी २०२० परीक्षेच्या नियोजित तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| ०१ | पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी अंतिम सत्राच्या परीक्षेकरीता परीक्षार्थी आहेत आणि पहिल्या व दुस–या सत्राच्या अनुत्तीर्ण विषयाची सुध्दा परीक्षा देणार आहेत अशा पहिल्या व दुस–या सत्राच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यात येतील | २१/१०/२०२० ते २८/१०/२०२० |
| ०२ | पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या तिस–या व चौथ्या सत्राची परीक्षा विद्यापीठामार्फत ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने बहुपर्यायी (M.C.Q.) प्रश्नसंच देवुन घेण्यात येतील. या परीक्षा विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परीक्षा केंद्रावर संपन्न होतील. | १५/१०/२०२० ते २०/१०/२०२० |

४. विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात येणा–या उन्हाळी –२०२० पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा बहुपर्यायी (M.C.Q.) पध्दतीनुसार असेल. त्यामध्ये एकुण ५० प्रश्न असतील त्यापैकी ४० प्रश्न विद्यार्थ्यांनी सोडावयाचे आहेत. यासाठी एक तासाचा वेळ देण्यात येईल. सदर परीक्षा ही ऑनलाईन/ऑफलाईन अशा दोनपैकी विद्यार्थ्याने निवडलेल्या कोणत्याही एका पध्दतीने विद्यार्थ्यास देता येईल.

५. या परीक्षेसाठी निगेटिव्ह मार्कींग असणार नाही.

प्राचार्य